# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. ०५
# सभा क्र.१२, दिनांक १०/०५/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (गुरूवार, दि. ०४/०५/२०२३ रोजीची) बुधवार, दि. १०/०५/२०२३ दुपारी ४.०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.१०७**

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे मार्च २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/८७, दि. २/५/२०२३चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१०८**

दि. ०३/४/२०२३ ते दि. ०९/४/२०२३ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ६५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/७२, दि. २७/४/२०२३ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०९**

दि. १०/४/२०२३ ते दि. १६/४/२०२३ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८५, दि. २८/४/२०२३ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.११०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील कामांच्यादि. १६ ते दि.२८ फेब्रुवारी २०२३ अखेर ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/७६, दि. २८/४/२०२३चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१११**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि.१ ते दि.१५ फेब्रुवारी २०२३ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.५/७७, दि. २८/४/२०२३चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.११२**

वारजेकर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अवधूत रामदास खिलारी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,८००/– पेक्षा ४६.३६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५३,६३,८९२=७२अधिक भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण /८६, दि. २८/४/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.११३**

ऐतिहासिक लालमहाल येथे किल्ल्याच्या दरवाजाची प्रतिकृती करणे तसेच सदर ठिकाणी मास्टर प्लॅनिंगनुसार विविध विकास व दुरूस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदारमे.आर.पी.चित्रोडा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २९,५९,७१३/- पेक्षा २% कमी दुरूस्त दराने) असल्याने त्यांचेकडूनर.रू. २९,००,५१८=७४ पर्यंत अधिक जीएसटी र.रू.५,३२,७४८/- अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. ७,३७०/- अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सुत्रानुसार करारनामा करून व काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/८९, दि. २/५/२०२३ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ११४**

कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील पावसाळी गटाराची साफसफाई व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अवधूत रामदास खिलारी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,४९,४४७/- पेक्षा ०.९९%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८३,६५,७९७=४८व अधिक जीएसटी र.रू. १५,२०,९००/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २९,४२९/- असे एकूण र.रू. ९९,१६,१२६=४८ व भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेत अथवा कपात चे काम उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/९०, दि. ३/५/२०२३ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ११५**

कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अवधूत रामदास खिलारी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,९७८/- पेक्षा ०.९९%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९९,००,९७८=२२व भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेत अथवा कपात चे काम उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/९१, दि. ३/५/२०२३ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ११६**

भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या नाल्याची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. साईलिला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ९९,९९,७८३/- पेक्षा ९.६९% कमी निविदा दराने तडजोडीने ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ९०,३०,८०४=०३ अधिक सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात करणेस व होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/९२, दि. ३/५/२०२३ चे पत्र.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**विषय क्र.११७**

Pune Municipal Corporation invites Expression of Interest (EOI) from eligible Contractors/Agecies to work as a Project implementation Agency (PIA) to restore-repair-refurbish-Recommissioning ( after conducting compulsory site visit and survey)E – toilets with GPS based automatic systems in PMC area with Operation and Maintenance for period of 3 years + (2 years Extendable based on performance assessment by PMC ) करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी मे. आदित्य एंटरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून काम करून घेण्यासाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/४३, दि. १९/४/२०२३ चे पत्र.

१) सदर कामासाठी सर्वात कमी दर देणारे टेंडरदार मे. आदित्य एंटरप्रायजेस यांची सर्वात कमी दराची निविदा आली असून, त्यांचे टेंडर अ) दुरूस्ती करून पुर्नकार्यान्वित करणेसाठी र.रू. १४,१२,४००/- ब) ३+२ वर्ष (Extendable) दैनंदिन देखभाल दुरूस्तीसाठी प्रती सिट प्रती महिना र.रू. ७००० याप्रमाणे र.रू. ९६,६०,०००/- असे एकूण मिळून र.रू. १,१०,७२,४००/- (अक्षरी र.रू. एक कोटी दहा लाख बहात्तर हजार चारशे रूपये पैसे फक्त ) अधिक जीएसटी ( तडजोडीने ) रकमेपैकी प्रथम ५ ई-टॉयलेट साठी दुरूस्ती करून पुढील ६ महिने कालावधी करिता प्रायोगिक तत्वावर काम करून घेणेस, चालविणेसाठी अपेक्षित खर्च.

अ) दुरूस्ती करणे ५ X १,२८,४०० =र.रू. ६,४२,००० अधिक जीएसटी

ब) प्रथम ५ ई-टॉयलेट ६ महिने कालावधी करिता चालविणे ७००० X ११ X ६ र.रू. ४,६२,०००/- अधिक जीएसटी प्रायोगिक तत्वावर सुरू करणे व चालविणेसाठी एकूण खर्च = र.रू. ११,०४,००० अधिक जीएसटी रक्कमेपर्यंत काम करून घेणेस, कार्यादेश देणेस, करारनामा करणेस व झालेल्या कामाची देयके अदा करणेस.

२) ६ महिने कालावधी करिता प्रथम ५ ई-टॉयलेट प्रायोगिक तत्वावर सुरू करून कामाची उपयुक्तता वापराची वारंवारता व गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन निविदेतील उर्वरित प्रथम ३ वर्षे कालावधीसाठी , तसेच ३ वर्षे कालावधीनंतर पुढील २

वर्ष Extendable कालावधी करिता निविदा अटी–शर्ती नुसार कामकाज करून घेणेस पुढील कार्यवाही करणेबाबतचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

३) ६ महिने कालावधी करिता प्रायोगिक तत्वावर सुरू करून कामाची उपयुक्तता वापराची वारंवारता व गुणवत्ता याबाबत आढावा घेऊन काम समाधानकारक असल्यास सुधारित अद्ययावत किमान दर अ) दुरूस्ती करून पुर्नकार्यान्वित करणेकामी र.रू. १४,१२,४००/– पर्यंत ब) ३+२ वर्ष (Extendable) दैनंदिन देखभाल दुरूस्तीसाठी प्रती सिट प्रती महिना र.रू. ७०००/– या प्रमाणे र.रू. ९६,६०,०००/– अधिक जीएसटी असे एकूण र.रू. १,१०,७२,४००/– अधिक जीएसटी (तडजोडीने) या रक्कमेपर्यंत निविदा अटीशर्ती प्रमाणे काम करणेस व सुधारित करारनामा करणेस,

४) झालेल्या कामाची देयके अदा करणेस व RE19A148 या अर्थशिर्षकावर खर्ची करणेस.

**( टीप– सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा असे दि.२६/४/२०२३ च्या सभेत ठरले होते. )**

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.११८**

पथ विभागामार्फत विकसीत करण्यात येणारी पुलांची कामे तसेच मोठ्या स्वरूपाचे रस्ते विकसन कामे याकरीता नेमण्यात येत असलेल्या तज्ञ सल्लागार यांचे मा. स्थायी ठराव क्र. १६०४, दि.११/१२/२०१२ अन्वये निश्चित केलेल्या दरा ऐवजी सर्व कामांकरिता शासन निर्णय क्र.संकीर्ण–२०१८/प्र.क्र.५४/नवि–१६, दि.०४/०६/२०१८ नुसार सर्व कामांकरिता एकाच प्रकारे ०.५०% (प्रीटेंडर) अधिक १.५% (पोस्ट टेंडर) एकूण २% अशी तज्ञ सल्लागार फी निश्चित करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/४४,दि. १९/४/२०२३ चे पत्र.

**( टीप– सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा असे दि.२६/४/२०२३ च्या सभेत ठरले होते. )**

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**